


।। श्री गजानन प्रसन्न ।।

।। श्री केशवराज प्रसन्न ।।

देवधर मंडळ

आपली आहे प्रगतीची

# वाटचाल

* वर्ष २३ वे, अंक १
* दि. १५ मार्च २०२३
* किंमत रु. २०/-

# देवधर मंडळ कार्यकारिणी

## दि. १ /४/२०१९ ते दि. ३१/३/२०२४

✻ **अध्यक्ष**

**सी.ए. सुरेश विश्वनाथ देवधर** (कु. वृ. पान २१/१६२)
१०२, आय विंग, प्रणय नगर, राममंदिर रोड (विस्तारित), बाभई, बोरिवली (प.), मुंबई ४०००९१
दूरध्वनी : ०२२-२८९८१८५६
मोबाईल : ९२२३३६६६४०, ९२२३५०६९८८

✻ **उपाध्यक्ष**

**ॲड. पुरुषोत्तम गोपाळ देवधर** (कु. वृ. पान ३६०/१६९)
ब्लॉक नं. २, भागिरथी टॉवर्स, सर्व्हे नं. ६, हि. नं. ११, कोकण एक्सप्रेस हॉटेल लेन, कोथरूड, पुणे ४११०३८. ❖ मोबाईल : ९८६०३०६३४४

✻ **कार्यवाह**

**सरिता मुकुंद देवधर** (कु. वृ. पान नं. ३५९/१२९)
११, रामकृष्ण भुवन, गोरेगांवकर बिल्डिंग नं. ६, गिरगांव, मुंबई ४००००४.
दूरध्वनी : ०२२-२३८९३९३०
मोबाईल : ९८२०६५९४४७

✻ **सहकार्यवाह**

**सौ. पूर्वा प्रमोद देवधर** (स्वीकृत)
(कु. वृ. पान ८८२/१३२२)
११/१२ सी, दुसरा मजला, झावबा वाडी, ठाकूरद्वार, मुंबई ४००००२. मोबाईल : ९८६९९३९०७२

✻ **कोषाध्यक्ष**

**सी.ए. अकल्पिता चिंतामणी देवधर**
(कु. वृ. पान८९८/१७७८)
देवधर हाऊस, दत्त आळी, गावदेवी चौक, कल्याण (प.) ४२१३०१. मोबाईल : ९८२०३५६४१३

✻ **वाटचाल (मुद्रक, प्रकाशक)**

**आशिष राम देवधर** (कु. वृ. पान ३१/२०३६)
सी/२५, सुरांकित, सिद्धेश्वर आळी, पारनाका, कल्याण (प.) ४२१३०१. मोबाईल : ७०४५३५३६०२

✻ **सभासद**

**नारायण (दिलिप) गोविंद देवधर** (कु.वृ. पान ४१८/१२३)
बी/१०३, आर.एन. ए. हाईट्स, जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोड, अंधेरी (पू.), मुंबई ४०००९३.
दूरध्वनी : ०२२-२८२५२१४५
मोबाईल : ९८१९९७२५११

✻ **सभासद**

✻ **श्री. वासुदेव नारायण देवधर** (कु.वृ.पान ४९७/१४५) (स्वीकृत)
सी/३, १०२, सॅटेलाईट क्लासिक, रेल्वे स्टेशनजवळ, गुंफा रोड, जोगेश्वरी (पू.), मुंबई ४०००६०
दूरध्वनी : ०२२-२८२६१०२८, मो.: ९८२०१३४०८४

✻ **संजय सुधाकर देवधर** (कु. वृ. पान ४९१/१७७९)
ए/४२, अनुभव कॉम्प्लेक्स, स्नेह पॅराडाईज, एम.आय.टी कॉलज रोड, कोथरूड, पुणे ४११०३८.
मोबाईल : ९८२३०७३३११

✻ **श्री. समीर सुरेश देवधर** (कु. वृ. पान ५८८/२२४१) (स्वीकृत)
बी/२४, कैलासधाम सोसायटी, गोपाळनगर गल्ली क्र. १, टायटन शोरूम च्या जवळ, डोंबिवली (पू.) ४२१२०१
मोबाईल : ९८३३१४८४८५

✻ **श्री. विष्णू विनायक देवधर** (स्वीकृत)
(कु.वृ.पान ४३९/१५२८)
बी-४, रूम नं. ३, सप्तर्षी सोसायटी, पांडुरंग वाडी, आनंदनगर, मानपाडा रोड, डोंबिवली (पू.) ४२१२०१
दूरध्वनी : ०२५१-२८०१८३०, मो. : ९८३३१५३९८९

✻ **कु. मीरा जगदीश देवधर** (स्वीकृत)
(कु.वृ.पान ५३४/२४०६)
स्वप्नशिल्प, फ्लॅट नं. १, पहिला मजला, नयनतारा नर्सिंग होम शेजारी, गुलमोहर कॉलनी, सांगली ४१६४१६. मोबाईल : ७०८३८४१४५५

✻ **श्रीमती शुभांगी सुनिल देवधर** (कु. वृ. पान ३१०) (स्वीकृत)
वैनतेय, प्लॉट नं. ३८, प्रेस्टिज पार्क, घाडगे नगर, नाशिक रोड, नाशिक ४२२१०१
दूरध्वनी : ०२५३-२४६४७८०
मोबाईल : ९८९०२४०५२२

✻ **मानद लेखा परीक्षक**

**सी.ए. किरण अनंत देवधर** (कु.वृ. पान १६२/१३७४)
१८ ई स्क्वेअर, स्टेट बँकेच्या वर, शहाजी राजे मार्ग, विलेपार्ले (पूर्व) मुंबई ४०००५७
मोबाईल : ९८२०३३५०९३

# अध्यक्षांचे मनोगत



नमस्कार.

१ फेब्रुवारी २०२३ रोजी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी देशाचा सन २०२३-२४ चा अर्थसंकल्प सादर केला. हा अर्थसंकल्प 'सर्वजन हिताय' आणि 'सर्वस्पर्शी' आहे.

प्रत्येकाचा, म्हणजेच नोकरदार, व्यापारी, गुंतवणूकदार, राजकारणी, गृहिणी, शेतकरी, कारखानदार यांचा अर्थसंकल्पाकडे पाहण्याचा दृष्टिकोन निरनिराळा असतो. प्रत्येकजण 'या अर्थसंकल्पात आपल्यासाठी काय?' याचाच विचार करतो आणि ते स्वाभाविक आहे. परंतु अर्थमंत्री आणि पंतप्रधान हे देशाचा विचार करतात. त्यात प्रामुख्याने संरक्षण, देशाची सुरक्षितता, आर्थिक स्थिती, आयात निर्यात, रोजगार, उत्पन्नाचे निरनिराळे स्रोत, आत्मनिर्भरता, पायाभूत सुविधा, जागतिक अर्थकारण अशा अनेक मुद्द्यांचा समावेश असतो.

हा अर्थसंकल्प 'सबका साथ-सबका विकास' या पंतप्रधान मोदी यांच्या घोषवाक्याचा कृतीरूप आराखडा आहे असं म्हणता येईल. यासाठी केलेल्या अनेकविध आर्थिक तरतुदींची माहिती आपणा सर्वाना ज्ञात आहेच! हा अर्थसंकल्प सिद्धीस नेण्यासाठी आपण आपल्या परीने प्रयत्न करू या.

मंडळाचा संकल्प हा आपल्या सर्व बंधुभगिनींचा सर्वांगीण विकास, प्रगती, आणि कौटुंबिक सुखसमाधान याच्याशी निगडीत असतो. त्या दृष्टिने आपण प्रयत्नशील राहू या. यासाठी आपण एकत्र येणं, प्रत्यक्ष गाठीभेटीतून आपले विचार व्यक्त करणं आणि त्यातून आपली प्रगती करणं, हे अत्यंत महत्त्वाचं आहे आणि म्हणूनच आपण वार्षिक स्नेहसंमेलनं, आनंद मेळावे यांचं आयोजन करतो.

५ नोव्हेंबर २०२२ रोजी डोंबिवली येथे आयोजित केलेला आनंदमेळावा, अतिशय सुनियोजित आणि अनेक नवीन सभासदांच्या उपस्थितीत संपन्न झाला. त्याचा वृतांत आपण १५ डिसेंबरच्या 'वाटचाल' मध्ये वाचला असेलच. असे आनंदमेळावे उज्जैन, नागपूर, सातारा, पंढरपूर असे निरनिराळ्या ठिकाणी जरूर आयोजित करू या. त्यासाठी तिथे राहणाऱ्या आपल्या कुलबांधवानी पुढाकार घ्यावा अशी अपेक्षा आहे. मदतीला आम्ही आहोतच. त्यामुळे स्थानिक आणि जवळपास राहणारे बंधु-भगिनींना आनंदमेवाव्यात सहभागी होता येईल, परसार परिचय होईल. आणि एकमेका साहाय्य करू अवघे होऊ सुखी-समाधानी समर्थ -श्रीमंत हा मंडळाचा उद्देश साध्य करता येईल

श्री. सदाशिवराव देवधर, पुणे हे आपले एक ज्येष्ठ कुलबंधू. आपले पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांचे एकेकाळचे सहकारी. नुकतेच त्याना पंतप्रधानांनी भेटीसाठी आमंत्रित केले होते. श्री. सदाशिवराव यांच्या या भेटीविषयी माहिती जाणून घेण्यासाठी तसेच त्यांच्या अनेकविध सामाजिक कार्याची माहिती करून घेण्यासाठी कार्यकारिणीचे काही सदस्य आणि काही कुलबांधवांनी ८ जानेवारी २०२३ रोजी

त्यांची भेट घेतली. या भेटीचे आयोजन - नियोजन शुभांगी सुनील देवधर, नाशिक यांनी उत्तमरीत्या केले होते. त्यांचा वृत्तांत याच अंकात दिला आहे.

या वर्षीचे वार्षिक स्नेहसंमेलन, वर्धापनदिन सांगली येथे आयोजित केले आहे येथे आपल्या कुलबंधु-भगिनींच्या कलागुणांचा आपल्याल परिचय व्हावा यासाठी आणि तरुण मंडळीचा सहभाग देवधर मंडळाच्या कार्यात व्हावा, यासाठी शनिवार ६ मे रोजी (दुपारी ४ ते ९) एक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला आहे

तसेच रविवारी ७ मे रोजी मंडळातर्फे पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. स्मरणिकचं प्रकाशन केले जाणार आहे स्मरणिकेसाठी मध्यवर्ती कल्पना पर्यटन अशी आहे. या दोन दिवसांच्या संमेलनासाठी शुल्क प्रत्येकी रुपये ७५० आहे. हे संमेलनही आपल्या नेहमीच्या परंपरेप्रमाणे आनंददायी आणि यशस्वी करू या! धन्यवाद!

**- सुरेश देवधर**
अध्यक्ष, देवधर मंडळ

***

# सावित्रीच्या लेकी

ती शिकली
तीनं शिकवलं
स्वतः दगड झेलले आणि साऱ्या लेकींसाठी
कवाड खोलले.
आज त्या शिकतायत
त्याही दगड झेलतायत
अंगावर नाही मनावर
तिने हातात दिलं
शस्त्र शिक्षणाचं
त्या लढतायत
पण अजून त्या
भोगतात शिक्षा
स्त्री असण्याची
अजूनही देह मनावरची सत्ता
दुसर्यांची
पण त्या लढतात कारण,
तिनं अक्षरातला
अंगार मनात ओतलाय लेखणीतून
जगतात ज्वाला मनात घेऊन
सावित्रीच्या लेकी होऊन.

**– सौ. शुभांगी संजय देवधर**
पुणे

## अभिनंदन : धनश्री देवधर

आई चॅरिटेबल ट्रस्ट, सिंधुदुर्ग शिवजन्मोत्सव २०२३ जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेत धनश्री सुधाकर देवधर हिच्या 'सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या विकासाच्या पुढील दिशा' या विषयावरील निबंधाला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. कणकवली येथे केंद्रिय मंत्री मा. श्री. नारायण राणे यांच्या हस्ते तिचा सत्कार झाला.

कु. धनश्री देवधर हिचे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!

# ❋ वार्षिक स्नेहसंमेलन ❋

सस्नेह नमस्कार.

येणाऱ्या गुढीपाडव्याच्या सर्व कुलबंधु–भगिनींना तसेच माहेरवाशिणींना हार्दिक शुभेच्छा!

या वर्षी आपल्या देवधर मंडळाचे वार्षिक स्नेहसंमेलन शनिवार दि. ६ व रविवार दि. ७ मे रोजी हरिदास भवन, सिटी हायस्कूल जवळ, बक्षी बोळ, गांवभाग सांगली येथे आयोजित करण्यात आले आहे. आपण आपल्या कुटुंबीयांसह या स्नेहसंमेलनास उपस्थित राहावे यासाठी हे आग्रहाचे निमंत्रण.

**संमेलन शुल्क माणशी रु. सातशे पन्नास मात्र (रु. ७५०/–) आहे.**

या संमेलनात प्रामुख्याने खालील गोष्टींचा समावेश करण्यात आला आहे.

❋ **शनिवार दि. ६ मे रोजी सायंकाळी ५.०० ते ९.००**

आपल्या कुलबंधु–भगिनींचे विविध कलागुणदर्शन, परस्पर परिचय इ.

❋ **रविवार दि. ७ मे रोजी सकाळी ९.०० ते दुपारी ३.००**

जीवन गौरव व इतर पुरस्कार, वयाची ७५ वर्षे व विवाहास ५० वर्षे पूर्ण केलेल्या सभासदांचा सत्कार, विशेष गुणवत्ता प्राप्त केलेल्या / यश संपादन केलेल्या सभासदांचा सत्कार, स्मरणिका प्रकाशन

दोन्ही दिवसांची सांगता भोजनोत्तर होईल.

## ❋ विनम्र आवाहन ❋

ज्या सभासदांनी वयाची ७५ वर्षे पूर्ण केली आहेत किंवा ज्यांच्या विवाहास ५० वर्षे पूर्ण झाली आहेत त्यांनी, तसेच विशेष गुणवत्ता/कौशल्य/पुरस्कार प्राप्त सभासदांनी आपली माहिती अध्यक्ष श्री. सुरेश देवधर व कार्यवाह श्रीमती सरिता देवधर यांना आगाऊ कळवावी. तसेच संमेलनाचे वेळी आपली उपस्थिती, नोंदणी करताना स्वयंसेवकांना सांगावी म्हणजे सत्कार समारंभाचे आयोजन करणे सुलभ होईल.

स्मरणिकेसाठी जाहिराती व पृष्ठप्रायोजकत्व देऊन सक्रीय सहकार्य करावे.

बाहेरगावाहून येणाऱ्या सभासदांसाठी (संख्या मर्यादित) शनिवार, दि. ६ मे २०२३ रोजी राहण्याची व्यवस्था कार्यालयात होऊ शकते. त्यासाठी सांगली येथील कार्यकारिणी सदस्य कु. मीरा देवधर (७०८३८४१४५५) यांच्याशी संपर्क साधावा. सुमारे पंचवीस जणांची सोय होऊ शकेल.

❋ आपले ❋

**सुरेश वि. देवधर**
अध्यक्ष
९२२३३६६६४०, ९२२३५०६९८८

**श्रीमती सरिता मु. देवधर**
कार्यवाह
९८२०६५९४४७


INVESTMENT
ADVISOR
MANJIRI SAMEER DEODHAR
MDRT FOR LAST 3 YEARS - 2019, 2020 & 2021
YOU WILL FIND UNDER ONE ROOF
✓ TATA AIA LIFE INSURANCE
✓ CARE HEALTH INSURANCE
✓ NEW INDIA ASSURANCE
✓ ALL TYPE OF INSURANCES
✓ MUTAL FUNDS
✓ DIFFERENT FLAVOURS OF INVESTMENTS
✓ ALL TYPES OF LOANS
✓ WILL WRITING
REACH ME
MOBILE NO.: 9833484857
EMAIL: manjiri06.deodhar@gmail.com
SOCIALLY CONTRIBUTING
SECRETARY -- CHITTAPAVAN SANGH, DOMBIVLI
JOINT SECRETARY -- BRAMHAN MAHASANGH, DOMBIVLI

# समर्पित व्यक्तींची भेट

**– शुभांगी सुनील देवधर,** नाशिक

देवधर मंडळातर्फे नवीन वर्षाची सुरुवात एका अनोख्या कार्यक्रमाने झाली. आपलेच ज्येष्ट कुलबंधु मा. सदाशिवराव देवधर यांचा सत्कार व त्यांच्याशी गप्पा असा कार्यक्रम आयोजित केला होता. अर्थातच मा. पंतप्रधान मोदी यांनी सदाशिवराव देवधर यांची घेतलेली भेट या संदर्भात या कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. कार्यक्रम मा. सदाशिवराव यांच्या पुणे येथील कार्यालयात कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमासाठी देवधर मंडळाचे अध्यक्ष मा. सुरेश देवधर, उपाध्यक्ष पी. जी. देवधर, सेक्रेटरी सरिता देवधर, खजिनदार अकल्पिता देवधर व इतर कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. तसेच सोलापूर, पुणे शहर, नाशिक येथूनही आलेली देवधर मंडळी उपस्थित होती. छान गरम पोह्यांचा अल्पोपाहार सर्वांना देण्यात आला, खास सदाशिवराव देवधर यांच्याकडून.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला अध्यक्ष सुरेश देवधर यानी सदाशिवराव यांचं स्वागत व सत्कार केला. व प्राजक्ता जहागिरदार हिने किशोरी आमोणकर यांनी गायलेला ''बोलावा विठ्ठल हा अभंग सादर केला. वातावरण भक्तिमय झाले. प्रसन्न वातावरणात कार्यक्रमाला सुरुवात झाली (प्राजक्ताने अ.भा.वि.प.चे काम करत असताना मा. सदाशिवराव देवधर यांच्या मार्गदर्शनाखाली काम केलं आहे)

मोदी यांच्या भेटी संदर्भात बोलताना सदाशिवराव भरभरून बोलत होते. मोदींचा व त्यांचा परिचय फार पूर्वीपासूनचा, गुजराथमधे प्रचारक म्हणून काम करत असल्यापासून. पण मोदी यांचं मोठेपण की त्यांनी ती ओळख मित्र म्हणून जपली आहे. त्यांच्याशी पत्रव्यवहारही चालू असतो. माननीय पंतप्रधान बेलूर मठाचे संन्यासी, त्यामुळे वेद, उपनिषदे, पुराण यांचा चांगला अभ्यास. साधेपण त्यांच्या वागण्यात झिरपतं. परदेश दौरा पण कोणत्याही लवाजाम्याशिवाय. त्यात कोणतेही आप्तस्वकीय बरोबर नसतात. अमेरिका दौऱ्यामध्ये मोदींनी जे अमेरिकन राष्ट्र संघामधे भाषण केलं, तेव्हा स्वामी विवेकानंद यांनी शिकागो धर्मपरिषदेत १८६३ साली केलेल्या भाषणाची आठवण झाली असं सदाशिवराव म्हणतात. मोदींसारखं नेतृत्व भारताला लाभले, जणू विकासाच्या दाही दिशा खुल्या झाल्या. 'वसुधैव कुटुंबकम्' ही संकल्पना त्यांनी जगासमोर ठेवली. मोदी यांच्या नेतृत्वामुळे आज सगळं जग भारताकडे आशेने बघत आहे. अनेक धाडसी निर्णय मोदी यांनी घेतले. त्यामुळे जास्तीत जास्त भारतीय जनतेची अपेक्षा आहे की, भारताचे नेतृत्व मोदी यांच्याकडेच असावे. समाजासाठी चांगलं काम करणाऱ्या ज्या व्यक्तींची नावं सदाशिवराव यांनी पद्म पुरस्कारसाठी मोदी यांना सुचवली, त्यांना पद्म पुरस्कार देण्यात आले.

मोदी आणि सदाशिवराव दोघांचे स्वप्न वैभवशाली भारताचं, कोणताही वैयक्तिक स्वार्थ त्यामधे नाही. भारताच्या संस्कृती, परंपरा, हिंदू धर्म यावर नितांत श्रद्धा असलेले व त्यासाठी संपूर्ण योगदान देणारे दोघेही. त्यांची भेट म्हणजे अखंड भारताचं चिंतन.

''स्त्री ही समाजाचा महत्त्वाचा घटक असून देशाच्या विकासामधे स्त्रीचा संपूर्ण सहभाग असायला हवा'' असा स्पष्ट विचार सदाशिवराव यांनी सर्वांपुढे ठेवला. त्यांच्या कारकिर्दीमधे अनेक तरुण

(..... पान ७ वर

# एक कळकळीचे आवाहन

सर्व कुल बंधुभगिनी आणि माहेरवाशीणींना सप्रेम नमस्कार.

आपणास माहीत आहे की, देवधर दीक्षित ढमढेरे या कौशिक गोत्री कुलबांधवांचे एक ज्ञाती मंडळ आहे. या मंडळाची स्थापना ४ फेब्रुवारी १९६८ साली झाली आहे. गेली ५४ वर्ष आपण या मंडळाच्या माध्यमातून अनेक उपयुक्त उपक्रम राबवित आहोत. आपल्यातील हुशार होतकरू आणि गरजू विद्यार्थ्यांना दरवर्षी आपण शैक्षणिक साहाय्य करीत असतो. (सदर विद्यार्थ्याने नोकरीस लागल्यावर स्वेच्छेने ही मदत परत करावी अशी अपेक्षा आहे.) अलीकडे आपण आणखी दोन नवीन उपक्रम सुरू केले आहेत. ते म्हणजे आपत्ती निवारण निधी आणि वैद्यकीय मदत निधी. या माध्यमातून आपण आपत्तीग्रस्त कुटुंबांना तसेच वैद्यकीय मदतीची गरज असलेल्या कुटुंबांना आर्थिक मदत करीत असतो. (वैद्यकीय मदत जेव्हा शक्य होईल तेव्हा स्वेच्छेने परत करावी अशी अपेक्षा आहे.)

आपल्या मंडळाचे दर तीन महिन्यांनी प्रसिद्ध होणारे वाटचाल हे त्रैमासिक आपण छपाई करून वितरित करतो. त्यामुळे आपण एकमेकांच्या संपर्कात राहू शकतो. देवधर मंडळाची वेबसाईटही आपण तयार केली आहे. त्यासाठीही खर्च होतो. हे सर्व उपक्रम सुरू राहण्यासाठी आपल्या मंडळाची आर्थिक स्थिती उत्तम असणे आपल्याकडे पुरेसा निधी उपलब्ध असणे अत्यंत आवश्यक आहे.

प्रारंभी फक्त रुपये शंभर एवढीच आजीव सभासद वर्गणी होती. त्यानंतर जवळजवळ ४० वर्षांनी आजीव सभासद वर्गणी रुपये ३०० करण्यात आली. आता गेल्या तीन वर्षांपासून रुपये १,००० आजीव सभासद शुल्क घेण्यात येते. आत्तापर्यंत आपले दरवर्षी होणारे वार्षिक स्नेहसंमेलन आपण निशुल्क घेत होतो. या वर्षी २०२२ ते संमेलन सशुल्क केले. तरीही खानपानाशिवाय होणारा इतर खर्च मंडळाला करावा लागतो. संमेलन सशुल्क करूनही सभासदांनी त्याला उत्तम प्रतिसाद दिला, त्याबद्दल मनापासून आभार.

आपण हे सुद्धा जाणता, नव्हे आपण ते अनुभवतच आहोत की, दिवसेंदिवस महागाई वाढत आहे आणि बँकेचे व्याजदर कमी होत आहेत. आपल्या उत्पन्नाचा एकमेव स्रोत म्हणजे बँकेतून मिळणारे व्याज, ते मात्र कमी होत आहे. त्यामुळे एक नवीन उपक्रम सुरू केला आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये याबाबत चर्चा होऊन उपस्थित असलेल्या सर्व सभासदांनी त्यास सर्वानुमते मंजुरी दिली आहे.

तो उपक्रम असा -

मंडळाच्या प्रत्येक आजीव सभासदाने संवर्धन निधी म्हणून दरवर्षी मंडळाला रुपये ३०० द्यावेत. मंडळाकडे जमा करावेत. ते ज्या आर्थिक वर्षात आपण मंडळाचे आजीव सभासद होऊ, त्यानंतर सुरू होणाऱ्या वर्षापासून उदाहरणार्थ एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ या आर्थिक वर्षात ते सभासद होतील त्यांनी त्यांनी ती वर्गणी अथवा निधी एप्रिल २३ पासून सुरू होणाऱ्या प्रत्येक आर्थिक वर्षी देणे अपेक्षित आहे. हा संवर्धन निधी मंडळाच्या कोषाधिकारी अकल्पिता देवधर यांचेकडे किंवा मंडळाच्या कार्यकारिणीच्या कुठल्याही सभासदाकडे द्यावा. अथवा मंडळाच्या बँक खात्यामध्येही आपण तो भरू शकता. सोबत बँकेचा खाते क्रमांक आणि इतर तपशील देत आहोत.

आपले सर्व उपक्रम (आनंद मिळावे, वार्षिक सर्वसाधारण सभा, मंडळाच्या वेबसाईटचा

खर्च, वार्षिक स्नेहसंमेलन, आपत्ती निवारण निधी, वैद्यकीय मदत निधी, शैक्षणिक मदत, वाटचाल छपाई व वितरण) यशस्वीरित्या राबविण्यासाठी हा संवर्धन निधी उपयोगी पडणार आहे आपल्या सक्रिय सहभागातून मंडळाची वाटचाल यशस्वीपणे सहजसाध्य होईल हे निश्चित.

आपणास नम्र आवाहन आहे की आपण आपला संवर्धन निधी मंडळाकडे लवकरात लवकर जमा करावा. बँकेत जमा केल्यास त्याचा screenshot काढून कोषाधिकारी अकल्पिता देवधर यांना पाठवावा म्हणजे त्याची नोंद करणे सुलभ होईल.

येणाऱ्या गुढीपाडव्याच्या आणि नववर्षाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा! हे वर्ष आपणास सुखसमृद्धीचे जावो हीच केशवराजचरणी प्रार्थना.!

**- सरिता मुकुंद देवधर**
कार्यवाह, देवधर मंडळ

मंडळाच्या बँक खात्याचा तपशील
नाव : देवधर मंडळ मध्यवर्ती
Deodhar Mandal Madhyavarti

१) बँक : बँक ऑफ महाराष्ट्र
   शाखा : पाथर्ली शाखा, डोंबिवली
   खाते क्र. : 60023916021
   IFSC : MAHB0000536
२) बँक : आयडीबीआय बँक
   शाखा : टिळक चौक, कल्याण
   खाते क्र. : 45310010007645
   IFSC : IBKL0000456

***

(५ वरून......

युवतीनी संपूर्णवेळ घरबाहेर राहून काम करण्याची तयारी दाखवली, ते केवळ सदाशिवराव यांनी त्यांच्या कुटुंबाशी संवाद साधून विश्वासाचं आणि आपुलकीचं नात निर्माण केलं त्यामुळेच. आजही सगळ्या कार्यकर्त्यांच्या मनामधे सदाशिवरावांबद्दल नितांत आदर आहे.

सदाशिवराव यांचं पत्रलेखन हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा मोठा पैलू आहे. वळणदार सुंदर अक्षर आणि ओघवती भाषा हे त्याचं वैशिष्ट्य. 'सानंद कुशल' हे पुस्तक म्हणजे त्यांनी लिहिलेल्या अशाच पत्रांचा संग्रह आहे. ते वाचनीय आहे. सदाशिवराव यांनी संपूर्ण आयुष्य संघकार्यासाठी समर्पित केलं. त्याबदल त्यांच्या मनात कृतार्थ भावना आणि समाधान आहे.

आपल कुटुंब ही आपली शक्ती आहे, कुटुंब जपा. मुलांना वेळ द्या, त्यांच्याशी संवाद साधा. त्यांना पंचतंत्र, रामायण, महाभारत हे गोष्टीरूपानी सांगा. म्हणजे ''मुलं हाताबाहेर गेली'' असं म्हणायची वेळ येणार नाही. हे गप्पांचा समारोप करताना सदाशिवराव यांनी आवर्जून सांगितले.

खरंतर सदाशिवराव यांचं कार्य जाणून घेणं हे इतक्या थोड्या वेळात शक्य नाही. ''पुन्हा भेटू या'' असं ठरवून मंडलचे अध्यक्ष सुरेश देवधर यांनी मंडळाच्या सम्मेलनाचे आग्रहाचे आमंत्रण सदाशिवराव यांना दिले. व अतिशय सुंदर रंगलेला गप्पांच्या कार्यक्रमाची सांगता झाली.

या कार्यक्रमाचे प्रसारण ऑनलाईन करण्यात आले. ३० ते ३५ जणांनी हा कार्यक्रम ऑनलाईन बघितला. प्रत्यक्ष ४० देवधर कुलबंधू-भगिनी कार्यक्रमाला उपस्थित होती. तांत्रिक बाजू प्रशांत देवधर यांनी सांभाळली. सर्वांच्या सहकार्याने कार्यक्रम नियोजित वेळेत संपन्न झाला.

***

# दु:खद निधन

* **मंगला मोरेश्वर देवधर**, पुणे
सभासद क्रमांक ११३५,
कु. पृ. क्रमांक ५०७
मृत्यू : दि. १० फेब्रुवारी २०२३

श्रीमती मंगला देवधर या मंडळाचे माजी अध्यक्ष कै. मोरेश्वर उर्फ बापुराव देवधर यांच्या पत्नी होत. बापुरावांच्या बरोबरीने त्याही मंडळाच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होत असत.

* **किशोर गणेश देवधर**, पुणे

ज्येष्ठ पत्रकार श्री. किशोर गणेश देवधर (वय ७४) यांचे ११ फेब्रुवारी २०२३ रोजी दु:खद निधन झाले. त्यांनी केसरी, तरुण भारत , मुंबई सकाळ आणि महाराष्ट्र हेराल्ड या वृत्तपत्रांमध्ये काम केले. मराठी बिल्ट्झचे ते काही काळ संपादकही होते. एकमेव चौकार हे पाक्षिक चालविण्यात त्यांचा मोठा हातभार होता. गेली अनेक वर्षे ते सकाळ दैनिकात शब्दकोडे देत असत. पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. त्यांचे पश्चात दोन मुली व नातवंडे असा परिवार आहे.

* **सौ. कांचन प्रदीप देवधर**,
डोंबिवली.
मृत्यू : १४ फेब्रुवारी २०२२
सभासद क्रमांक ८७४, पृष्ठ क्रमांक ५०५

* **विनायक विठ्ठल देवधर**, कोल्हापूर
सभासद क्रमांक ३५६, कु.पृ.क्रमांक ७४
मृत्यू : दि. ६ जानेवारी २०२३

* **यशवंत भिकाजी देवधर**, पुणे
सभासद क्रमांक ११३५, कु.पृ.क्र.५०७
मृत्यू : दि. १३ जानेवारी २०२३

* **निर्मला पुरुषोत्तम दीक्षित**,
डोंबिवली
मृत्यू : दि. २० फेब्रुवारी २०२३

* **स्नेहलता दीक्षित**, मुंबई
मृत्यू : दि. १२ मार्च २०२३
स्नेहलता दीक्षित या सुप्रसिद्ध अभिनेत्री माधुरी दीक्षित यांच्या मातोश्री. देवधर मंडळाच्या कार्यकारिणीच्या सभा त्यांच्याही घरी पूर्वी झालेल्या होत्या.

* **अशोक वासुदेव देवधर,** रेवदंडा
सभासद क्र. ८७, कु.पृ. क्र ५५५
मृत्यू : ०४-०३-२०२३

* **स्वाती श्रीधर देवधर**, भोपाळ
मंडळाच्या सभासद नव्हत्या
मृत्यू : १०-०३-२०२३

* **प्रतिभा वसंत देवधर**, सिल्व्हासा
मंडळाच्या सभासद नव्हत्या
मृत्यू : १२-०३-२०२३

दु:खितांचे दु:खात देवधर मंडळ सहभागी आहे.

- अध्यक्ष



आपले एक ज्येष्ठ कुलबंधू श्री. सदाशिवराव देवधर यांच्याशी पुणे येथे गप्पांचा कार्यक्रम आयोजित केला होता.
कार्यक्रमात मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचा सत्कार केला.



मंडळाची कार्यकारिणी सभा कर्जत येथे श्रीमती शुभांगी देवधर यांच्या घरी आयोजित करण्यात आली होती.
त्या वेळी पंचाहत्तरीनिमित्त अध्यक्ष श्री. सुरेश देवधर यांचा श्रीमती शुभांगी व चि. यश यांनी सत्कार केला.

||श्री केशवराज प्रसन्न ||

# देवधर मंडळ



## निमंत्रण

## वार्षिक स्नेहसंमेलनाचे

या वर्षी आपल्या देवधर मंडळाचे वार्षिक स्नेहसंमेलन

**शनिवार दि. ६ व रविवार दि. ७ मे रोजी**

हरिदास भवन, सिटी हायस्कूल जवळ, बक्षी बोळ, गांवभाग सांगली

येथे आयोजित करण्यात आले आहे.

आपण आपल्या कुटुंबीयांसह या स्नेहसंमेलनास उपस्थित राहावे

यासाठी हे आग्रहाचे निमंत्रण.



✽ आपले ✽

**देवधर मंडळ कार्यकारिणी सभासद**



Book Packet
Containing periodical
R.N.I. No. : MAHMAR/2000/4869

**प्रति,**

**माननीय**

संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक श्री. वा. ना. देवधर यांचेसाठी आशिष देवधर यांनी साधना ऑफसेट, भारताचार्य वैद्य चौक, कल्याण येथे छापून, वैद्य वाडा, टिळक चौक, कल्याण (प.) ४२१३०१ येथे प्रसिद्ध केले.